## सांस्कृतिक विभाग

## २०१७-१८

## अहवाल

आमच्या मे. ए. सो. कला व वाणिज्य महाविद्यालय, मेहकर जि. बुलढाणा येथे सांस्कृतिक विभाग कार्यरत आहे. सांस्कृतिक विभागांतर्गत अनेक सामाजिक, शैक्षणिक, बौद्धिक, जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. या सत्रात खालील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**१. अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य टिकळ पुण्यतिथी :**

**१, ऑगस्ट २०१७ रोजी**

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. ग. ना. परिहार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. गणेश सावजी यांनी अण्णा भाऊ साठे, तर डॉ. पी. पी. गिरणीवाले यांनी लोकमान्य टिळक यांच्या अनुक्रमे साहित्यिक व समाजसुधारक या अंगाने कार्य कर्तृत्वावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवला. तसेच, प्राचार्य परिहार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मौलिक मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. पद्मणे यांनी केले. बहुसंख्येने विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्राध्यापक वर्गाची उपस्थिती दर्शविली.

**२. कविवर्य ना. घ. देशपांडे जयंती :**

मे. ए. सो. चे माजी अध्यक्ष कविवर्य ना. घ. देशपांडे यांनी जयंती २१ ऑगस्ट २०१७ रोजी संपन्न झाली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून महिला महाविद्यालय, मेहकरचे प्रा. डॉ. मेघराज शिंदे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. ग. ना. परिहार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम चांगला पार पडला.



Scanned with CamScanner

### ३. शिक्षक दिन :

५ सप्टेंबर २०१७ रोजी दरवर्षी हा कार्यक्रम वेगळ्या पद्धतीने विद्यार्थी आयोजित करतात. विद्यार्थ्यांचे स्वयंशासनाने या दिवशी सर्व विद्यार्थी सहभाग घेतात. प्राचार्यांपासून तर शिपाई पदापर्यंतच्या भूमिका विद्यार्थी-विद्यार्थीनी पार पाडतात. यावर्षी एकूण १७ विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयाच्या शिक्षकांच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांनी अध्यापन केले. नंतर, छोटेखानी कार्यक्रमातून सर्व प्राध्यापकांचे पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्याकरवी स्वागत करण्यात आले. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. परिहार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी व्यासपीठावर डॉ. गजभिये, डॉ. काळे, प्रा. गिरी हे विभागप्रमुख म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांची महती, आपल्या जीवनातील स्थान विशद करून ऋण मान्य केले. शेवटी अध्यक्षांनी आपल्या भाषणातून उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले.

### ४. गुणवंतांचा सत्कार समारंभ :

दिनांक ९ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी व माजी (विविध पदांवर नोकरी) विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ग. ना. परिहार होते. तर माजी विद्यार्थी मा. गिरीश उमाळकर (व्यवस्थापक सत्यजित को-ऑप-बँक, मेहकर) प्रमुख वक्ते होते. या प्रसंगी संस्थेचे सचिव हर्षलजी सोमण, सदस्य नीरज देशपांडे व प्रमोद मुळे यांची उपस्थिती होती. वक्त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरक, मार्गदर्शक ठरतील असे जीवनाभुव सांगितले. तर मान्यवरांनीही गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी सहभाग नोंदवला.

### ५. विनोबा भावे जयंती :

११ सप्टेंबर २०१७ रोजी प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख वक्ते म्हणून इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. ओ. म. गजभिये यांची उपस्थिती होती. त्यांनी प्रभावीपणे विनोबांचे विचार विद्यार्थ्यांसमोर ठेवले. अध्यक्षांनी भाषणातून मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते. सर्वच प्राध्यापक वृंद व कर्मचारी यांनी सहभागी होवून सहकार्य केले.



Scanned with CamScanner

**६. महात्मा फुले पुण्यतिथी : -**

२८ नोव्हेंबर २०१७ ला हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.डॉ. मेघराज शिंदे हे होते. तर, प्रा. वसंत गिरी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. प्रध्यापक वृंद व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पद्मणे यांनी तर प्रा. सावजी यांनी आभार मानले. वक्त्यांनी आपल्या भाषणातून महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवला. अध्यक्षांनी सर्वांना मार्गदर्शन केले.

**७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन :**

डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्राचार्य डॉ. ग. ना. परिहार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम शासकीय वसतीगृह मेहकर येथे संपन्न झाला. नेहमीपेक्षा वेगळ्या पद्धतीने हा कार्यक्रम घेण्यासाठी मेहकर येथील मुलांचे व मुलींच्या वसतीगृहात जाऊन गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वापट करण्यात आले. यामध्ये प्रत्येकी २ रजिस्टर व पेन या साहित्याचा समावेश होता. या प्रसंगी वसतीगृहाचे अधीक्षक, तेथील कर्मचारी व मे. ए. सो. महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गजभिये, प्रा. सावजी, प्रा. पदमणे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तसेच, सामाजिक कार्याचा आदर्श ठेवून डॉ. बाबासाहेबांच्या जीवनचरित्रावर अध्यक्षांनी प्रकाश टाकला व मार्गदर्शन केले.

**८. माहिती अधिकार सप्ताहानिमित्त कार्यक्रम व निबंध स्पर्धेचे आयोजन :**

दि ११ ऑक्टोबर २०१७ रोजी राज्यशास्त्र विभाग व सांस्कृतिक विभागाच्या वतीने हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ग. ना. परिहार होते, तर प्रमुख वक्ते म्हणून गो. से. कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथील अभ्यासक डॉ. प्रतिभा टावरी हे लाभले. व्यासपीठावर प्रा. पद्मणे तसेच डॉ. गिरणीवाले उपस्थित होते. वक्त्यांनी आपल्या भाषणातून माहितीच्या अधिकार म्हणजे दुसरे स्वातंत्र्य या शब्दांत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर नंतरच्या आयोजित निबंध स्पर्धेत एकून ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



Scanned with CamScanner

**९. उन्मेष महोत्सव २०१९ :**

दरवर्षी प्रमाणेच या शैक्षणिक सत्रात दि. ९ जाने, १० जाने ११ जाने व १३ जाने २०१८ या चार दिवसात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पुष्प सजावट स्पर्धा, गीतगायन, कवितावाचन स्पर्धा, नौकानयन स्पर्धा, मिमिक्री, रांगोळी स्पर्धा, शेतकरी आत्महत्या हे नाटक, प्रश्नमंजुषा, आनंदमेळा यासारख्या विविध स्पर्धांचा समावेश होता. महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांचा हिरीरीने सहभाग राहिला.

**१०. मराठी भाषा दिन : २७ फेब्रुवारी २०१८.**

मराठी भाषा दिन / कुसुमाग्रज जयंती प्राचार्य डॉ. ग. ना. परिहार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. निलेश गायकवाड यांनी 'मराठी भाषा व संस्कृती' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सपना म्हस्के यांनी केले. सर्व प्राध्यापक वर्ग व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**११. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन : बक्षीस वितरण समारंभ :**

शैक्षणिक सत्र २०१७-१८ मधील गुणवंत व विशेष प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ग.ना. परिहार मे. ए. सो. चे कोषाध्यक्ष मा. सुधीर मुळे, कला, वाणिज्य विभागाचे प्रमुख व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. पाहुण्यांनी गुणवंताचे कौतुक केले. समारंभ उत्साहात पार पडला.

प्रा. श्री. वा. पद्मणे

सांस्कृतिक विभागप्रमुख

२०१७-१८

Scanned with CamScanner

## लो. टिळक पुण्यतिथी व अण्णा भाऊ साठे जयंती



लो. टिळक पुण्यतिथी व अण्णा भाऊ साठे जियंतीनिमित्त दीपप्रज्वलन करताना प्राचार्य डॉ. परिहार व प्रा. सावजी



उपस्थित विद्यार्थी

Scanned with CamScanner




लो. टिळक पुण्यतिथी व अण्णा भाऊ साठे जियंतीनिमित्त व्यासपीठावर उपस्थीत मान्यवर व सूत्रसंचालन करताना प्रा. पद्मणे

Scanned with CamScanner

# शिक्षक दिन




शिक्षक दिनानिमित्त व्यासनीठावरील मान्यवर प्राचार्य डॉ. परिहार व प्रा.डॉ. गजभिये




उपस्थित विद्यार्थी

Scanned with CamScanner

## विद्यार्थी वर्ग घेताना





Scanned with CamScanner

## गुणवंतांचा सत्कार



गुणवंताच्या सत्कार समारंभात कौतुक करताना संस्था सचिव हर्षलजी सोमण




विद्यार्थीनीला प्रमाणपत्र देताना प्रमोदजी देशपांडे तर सूत्रसंचालन करताना प्रा. पी.डी.परिहार

Scanned with CamScanner




प्रसंगी बोलताना प्रमुखपाहुणे गिरीशजी उमाळकर



प्रमाणपत्र वितरण करताना नीरजजी देशपांडे

Scanned with CamScanner

रक्तदान शिबिर दि. १२ सप्टेंबर २०१७

तरुण भारत 6/8

अवाहन जिल्हा युवा कार्यक्रम समन्वयक डॉ. दत्ता देशमुख यांनी केले आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

आला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली व बराच मोठा परिवार आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# मेएसो महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**मेहकर, १२ सप्टेंबर ▸▸**

मेहकर एज्युकेशन सोसायटीच्या मेएसो महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना व बुलढाणा अर्बन ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने १२ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ग. ना. परिहार यांनी केले. याप्रसंगी ब्लड बँकेचे संपर्क अधिकारी वैभव वायवाळ यांनी रक्तदानाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी ४५ स्वयंसेवकांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. उदय काळे यांनी तर आभार प्रा. पी. डी. परिहार यांनी मानले.

तसेच ११ सप्टेंबर रोजी भारतरत्न विनोबा भावे जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. परिहार यांची उपस्थिती लाभली. प्रमुख वक्ते इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. ओम गजभिये होते. प्राचार्य परिहार यांनी जीवन आणि शिक्षण यांची सांगड कशी घालावी हे सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. गणेश सावजी यांनी केले. तर आभार दत्ता मानघाले यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. जीवनात विद्यार्थ्यांनी प्रयत्न आणि परिश्रम हे केलेच पाहिजे असे सांगून प्रा. परिहार यांनी विविध महान लोकांची उदाहरणे विद्यार्थ्यांना सांगितली ◀(तभा वृत्तसेवा)



रक्तदान शिबिरात बोलतांना प्राचार्य परिहार व इतर



विद्यार्थीनीचा सत्कार करतांना मान्यवर

## गुणवंतांचा सत्कार

स्थानिक मेएसो महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी तसेच विविध पदावर कार्यरत माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. परिहार अध्यक्षस्थानी होते. गिरीश उमाळकर प्रमुख वक्ते होते. प्रसंगी संस्थेचे सचिव हर्षल सोमण, सदस्य नीरज देशपांडे व प्रमोद मुळे यांची उपस्थिती होती. भारतीय सैन्यात कार्यरत असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. व इतरांनी त्यापासून प्रेरणा घेऊन देशसेवा करावी हा संदेश देण्यात आला. गिरीश उमाळकर यांनी त्यांचे जीवनानुभव विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरतील असे व्यक्त केले. सचिव हर्षल सोमण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे कौतुक केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीकृष्ण पद्मने यांनी तर आभार वसंत गिरी यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्राध्यापकवृंद व विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला.

Scanned with CamScanner

# विनोबा भावे जयंती




विनोबा भावे जयंती निमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. परिहार व सूत्रसंचालक प्रा. सावजी



उपस्थीत विद्यार्थी

Scanned with CamScanner


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन





शालेय साहित्य वाटप करताना प्राचार्य डॉ. परिहार, डॉ. गजभिये व डॉ. पद्मणे

Scanned with CamScanner





कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी

Scanned with CamScanner

सांस्कृतिक महोत्सव



प्राध्यापक वृंद व विद्यार्थी



व्यासपीठावर प्राचार्य डॉ. परिहार, डॉ. हुंबाड व प्रा. गोरेगावकर

Scanned with CamScanner

आनंद मेळावा



उद्घाटन प्रसंगी प्राचार्य व प्राध्यापक वर्ग

Scanned with CamScanner